पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/०९/२०१९
## दि.०४/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३९६/१९,भादविक ३०७,आर्म ॲक्ट ३(२५),४(२५) |
| **फिर्यादी** | एक महिला, वय-५५,रा.रत्नप्रसाद रघुवीर हौसिंग सोसा.मुकूंदनगर,पुणे |
| **आरोपी** | विनोद सुधाकर सराफ,वय-४४,रा.फ्लॅट नं.१४,गुजरात कॉलनी,कोथरुड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०९/२०१९ रोजी १९/३० वा.४१६/३,रत्नप्रसाद रघुवीर हौसिंग सोसा.मुकूंदनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम विनोद सुधाकर सराफ हा फिर्यादी यांचे चुलत बंधु असुन,फिर्यादी व त्यांचे जळगाव येथील वडीलोपार्जीत जमिनीचा वाद जळगाव दिवाणी कोर्टात चालु आहे. फिर्यादी हया नमुद वेळी त्यांचे घराचे गेट उघडत असताना,सदर इसमाने फिर्यादीस ताई इकडे बघ असे म्हणुन त्यांना धक्का देवुन,खाली पाडुन त्यांचे तोंडावर व मांडीवर धारदार हत्याराने वार करुन,गंभीर जखमी करुन, फिर्यादीस जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कदम ९८२३६२४५८५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे ३२५/१९,भादविक ४६,४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-८१ वर्ष,रा.ईस्ट्रीट कॅम्प,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०९/२०१९ रोजी १०/३० वा.फिर्यादी यांचे राहते घरातुन मोबाईल माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक व्यक्तीने फिर्यादीस फोन करून,त्यांना तुमच्या बँकेच्या क्रेडीट कार्डाचा नंबर हा तुमचाच आहे का असे विचारून,त्याबाबत त्यांना दोन ते तीन वेळा फोन करून,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून,त्यांचे क्रेडीट कार्डावरून एकुण ५०,०००/- रू रकमेची खरेदी करून फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे), एम.डी.देवरे ९९२३१०७४७१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ३९२/१९,भादविक ३५३,२९४,५०६,मुंबई दारूबंदी अधि.८५ |
| **फिर्यादी** | म.पो.शि.पुजा सारसर, शिवाजीनगर पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | एक महिला,वय-३० रा.अहमदनगर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०९/२०१९ रोजी पहाटे ०२/०० वा. ज्ञानेश्वर पादुका चौक ते शिवाजीनगर पो स्टे या ठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे सरकारी कर्तव्य बजावीत असताना,यातील नमुद महिला हि दारूचे नशेत सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालीत होती. फिर्यादी यांनी तीला समजाविण्याचा प्रयत्न केला असता,तीने फिर्यादी यांना अपशब्द वापरून,त्यांना धक्का-बुक्की करून,धमकी देवुन,फिर्यादी हे करीत असलेल्या त्यांचे शासकिय कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. डी.एस.झडते ९१३००५२७१४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३०६/१९,भादविक ३८०,५११,४२७,३४ |
| **फिर्यादी** | भगवान हंबर्डे, पोलीस शिपाई, खडकी पो. स्टे. पुणे शहर |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०९/२०१९ रोजी पहाटे ०१/४७ वा. ते सकाळी ०१/५३ वा.चे दरम्यान शॉप नं.१९ रविराज हेरीटेज,भाऊ पाटील रोड,बोपोडी,पुणे येथील आयसीआयसीआय बँकेचे एटीएम सेंटर मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी संगनमत करून,शॉप नं.१९ रविराज हेरीटेज,भाऊ पाटील रोड बोपोडी,पुणे येथील आयसीआयसीआय बँकेचे एटीएम सेंटर मध्ये उघडया दरवाजावाटे आंत प्रवेश करून,आयसीआयसीआय बँकेचे ए.टी.एम.मशीनची लोखंडी पत्र्याची स्क्रीन व दार हे कटावणीच्या साहाय्याने उचकटुन,त्यामधील रोख रक्कम चोरी करण्याचा प्रयत्न करुन ए.टी.एम. मशीनचे वरील बाजुस छताला लावलेले दोन्ही कॅमे-यांवर पांढ-या रंगाचा पदार्थ टाकुन,कॅमे-यांच्या वायर कापुन वायरचे नुकसान करण्यास कारणीभुत झाले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अमोल भोसले ९५२७३१७५२७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ४७८/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३९ वर्षे,रा.ओशियापार्क सोसायटी,कोंढवा-बुद्रुक,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०९/२०१९ रोजी २०/३५ वा.ते २०/५५ वा.चे दरम्यान बालाजी मिनी मार्केट समोर, पवार हॉस्पीटलचे समोर बालाजीनगर,धनकवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचेकडील २,५०,०००/- रुपये रोख रक्कम त्यांचे खाकी रंगाचे बॅगेत ठेवुन,ती बॅग रोख रकमेसह त्यांचे ज्युपिटर मोपेडच्या डिक्कीत टाकुन, मोपेडने नमुद ठिकाणी येवुन,मोपेडच्या डिक्कीला लॉक करुन दुकाना समोर पार्क करुन, त्यांचे घरासाठी लागणारे किरकोळ सामान घेवुन,सदरचे सामान हे त्यांनी पार्क केलेल्या मोपेडच्या डिक्कीत ठेवण्यासाठी गेले असताना,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांचे मोपेडची डीक्की उघडुन, त्यामधील खाकी रंगाची बॅग रोख रकमेसह चोरून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. देव |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**